# Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane

**(Arts, Science and Commerce)**

**Re-Accredited "B+" Grade (3rd Cycle, CGPA 2.69) by NAAC, ISO 21001:2018 (Certified)**

**(Affiliated to University of Mumbai)**

## ACADEMIC YEAR 2019-2020

## (A)

## GURUVARAYA S. V. KULKARNI MEMORIAL LECTURE SERIES IN SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE, THANE

## Date: 11th DECEMBER, 2019.



# ठाण्यात गुरूवर्य स. वि. कुलकर्णी गौरव व्याख्यानमाला

ठाणे, दि. १०(वार्ताहर)- सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे राष्ट्रीय सेवा योजना आयोजित गुरूवर्य स. वि. कुलकर्णी गौरव व्याख्यानमाला यंदा ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या पटांगणात १३ आणि १४ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.३०वाजता होणार आहे. आज एका पत्रकार परिषदेत महाविद्यालयाचे अध्यक्ष सतीश प्रधान यांनी माहिती दिली.

पत्रकार परिषदेला महाविद्यालयाचे सेक्रेटरी कमलेश प्रधान, खजिनदार सतीश शेठ, अशोक चिटणीस, प्राचार्य चंद्रशेखर मराठे, प्रा.प्रदीप ढवळ आदी मान्यवर उपस्थित होते. शुक्रवार १३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता ज्येष्ठ शास्त्रज्ञ सुहास नाईक साटम यांचे चंद्रयान-२ या विषयावर व्याख्यान देणार आहेत. शनिवार १४ डिसेंबर रोजी तृतीयपंथी श्रीगौरी सावंत या मला काही सांगायचं आहे... याविषयावर गप्पा मारणार आहेत.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे राष्ट्रीय सेवा योजना आयोजित गुरूवर्य स.वि. कुलकर्णी गौरव व्याख्यानमाला यंदा रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक आणि ठाणे शहराचे महापौर नरेश म्हस्के यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच, व्याख्यानमालेच्या पहिल्या दिवशी १३ डिसेंबर रोजी आदर्श शिक्षक पुरस्कारही प्रदान करण्यात येणार आहे. कै. सरलाताई चिटणीस यांच्या नावाने दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार पुर्व प्राथमिक विभागाला १ आणि प्राथमिक विभागाला एक, स्वातंत्र्यसेनानी दत्ताजी ताम्हाणेयांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकाला एक आणि वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकाला एक तसेच, ज्ञानसाधना महाविद्यालयाच्यावतीने महाविद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालयातील आणि वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकाला एक असे सहा पुरस्कार नरेश म्हस्के यांच्या हस्ते प्रदान केले जाणार आहे.

ठाणेवैभव Wed, 11 December 2019 https://www.readwhere.com/read/c/46752257


### TRANSLATION OF THE ABOVE NEWS ARTICLE

This article was published in "Thane Vaibhav" Newspaper. The article titled "Guruvaray S. V. Kulkarni Gaurav Vyakhyanmala in Thane" states:

Thane, Dec 10 (Reporter) – The prestigious Satish Pradhan Dnyanasadhana College in Thane, in collaboration with the Thane National Service Scheme (NSS), is organizing the *Guruvaray S. V. Kulkarni Gaurav Vyakhyanmala* lecture series at the college auditorium on December 13 and 14 at 4:30 PM. The college president, Dr. Satish Pradhan, shared this information today with the press. This lecture series, organized under the National Service Scheme, aims to honor the contributions of Guruvaray S. V. Kulkarni. Prominent individuals like Sadanand More, Satish Pradhan, Dr. Nagnath Kotapalle, Pradeep Awate, Dr. Abhay Hanjura, and Sunil Ambekar will address various topics. Additionally, books will be released during the program. Principal of Gnyanasadhana College, Dr. R.S. Pawar, and NSS officials are involved in the coordination of this program. Several intellectuals and distinguished guests will attend this event.

**(B)**

# 25TH GURUVARAYA S. V. KULKARNI MEMORIAL LECTURE SERIES IN SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE, THANE



## व्याख्यानमाला, सांस्कृतिक महोत्सवांचा हंगाम सुरू

### ठाणे, कल्याण, डोंबिवलीत विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी, ठाणे

**वाढत्या नागरीकरणातही** 'सांस्कृतिक नगरी' ही आपली ओळख टिकवून ठेवणाऱ्या ठाणे आणि डोंबिवली या शहरांमधील नागरिकांना मनोरंजनासोबत बौद्धिक खुराक मिळणार आहे. येत्या काही दिवसांत या शहरांत विविध ठिकाणी व्याख्यानमाला, संगीत महोत्सव, शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. साधारणतः डिसेंबर ते जानेवारी या कालावधीत पार पडणाऱ्या या कार्यक्रमांची नागरिक आतुरतेने वाट पाहत असतात. तो हंगाम आता सुरू झाला आहे.

**कार्यक्रमांची मांदियाळी**

**स. वि. कुलकर्णी व्याख्यानमाला**

ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत गुरुवर्य स. वि. कुलकर्णी या व्याख्यानमालेचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. यंदा या व्याख्यानमालेचे २५वे वर्ष आहे. या वर्षीच्या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प हे १३ डिसेंबर रोजी शास्त्रज्ञ सुहास नाईक साटम हे 'चांद्रयान-२' या विषयावर गुंफणार आहेत. तर, १४ डिसेंबर रोजी गौरी सावंत हे 'मला काही सांगायचं आहे' या विषयावर दुसरे पुष्प गुंफणार आहेत.

**'आयपीएच'चा माइंडफेस्ट**

आयपीएचतर्फे 'माइंडफेस्ट' या तीन दिवसीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 'माझ्या जगण्याचं नेमकं काय करायचं अर्थात वेदान्तविचार आणि व्यक्तिमत्त्व विकास' या संकल्पनेवर आधारित हा महोत्सव १३, १४ आणि १५ डिसेंबर या कालावधीत ठाण्यातील गडकरी रंगायतन समोरील समर्थ सेवक मंडळाच्या पटांगणात पार पडणार आहे.

**पक्षीमित्र संमेलन**

विद्यार्थ्यांना ठाण्याच्या खाडी किनाऱ्यावर किंवा राष्ट्रीय उद्यान परिसरात असणारे पक्षी यांची माहिती मिळावी, या उद्देशाने जिज्ञासा ट्रस्ट, पर्यावरण दक्षता मंडळ, होप, फर्न आणि यूबीजीसी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी पक्षीमित्र संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन २२ डिसेंबर, रोजी सकाळी ७.३० वाजता मो. ह. विद्यालय, ठाणे येथे होणार आहे.

**देवगंधर्व महोत्सव**


कल्याण गायन समाजातर्फे आयोजित करण्यात येणारा देवगंधर्व महोत्सव यंदा १३, १४ आणि १५ डिसेंबर या कालावधीत आचार्य अत्रे रंगमंदिर येथे रंगणार आहे. या महोत्सवात सतारवादक पूर्बायन चॅटर्जी, शास्त्रीय गायक पं. कैवल्यकुमार, तबलावादक पं. योगेश समसी, पं. रघुनंदन पणशीकर अशी नामवंत मंडळी कला सादर करणार आहेत.

**Translation for above S. V. Kulkarni Lecture Series Media Coverage**

The S. V. Kulkarni Lecture Series is organized every year under the National Service Scheme of Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane. This year marks the 25th year of the lecture series. The first lecture of this year's series will be delivered on 13th December by scientist Suhas Naik Satam, who will speak on the topic "Chandrayaan-2." On 14th December, Gauri Sawant will deliver the second lecture on the topic "I Have Something to Say."

**(C)**

## LATE S V KULKARNI MEMORIAL LECTURE TO BE HELD BETWEEN $13^{TH}$ & $14^{TH}$ DECEMBER, 2019.



uniindia.com/late-s-

Posted at: Dec 10 2019 5:19PM

### Late S V Kulkarni memorial lecture to be held b/w Dec 13-14

Thane, Dec 10 (UNI) Satish Pradhan Dyansadhana Mahavidyalaya Chairman Satish Pradhan on Tuesday announced that Late S V Kulkarni memorial lecture will be held in the city between December 13-14.

He expressed serious concern over the dipping popularity of the lectures held in memory of prominent personalities.

Addressing a news conference here, Mr Pradhan said, "Memorial lectures being held in memory of prominent personalities, which were earlier being considered the most important ones, are gradually loosing its popularity these days, and in recent past, the attendance in them is getting reduced day by day."

Please log in to get detailed story.

**(D)**

**"RISING DAY SPECIAL: HOW DRUGS RUIN FAMILIES"**

**"A SESSION BY THE POLICE COMMISSIONER"**

# अंमली पदार्थाने होते कुटुंबाची वाताहत

## रेझिंग डे निमित्त मार्गदर्शन



ठाणे, (वा.) ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात पोलिस रेझींग डे निमित्त अंमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम या बाबत विद्यार्थ्यांना मध्ये जनजागृती करीत उत्तम आरोग्य आणि शिक्षण याची कास धरण्याचे आवाहन करण्यात आले.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे येथे 'पोलीस रेझिंग डे' च्या निमित्ताने नागरी संरक्षण दलाच्या वतीने स्वयंसेवक विद्यार्थ्यांसाठी 'अंमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये अंमली पदार्थ विरोधी पथक ठाणे शाखेतील सहाय्यक पोलिस आयुक्त इंद्रजित कार्ले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश गावित यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटनांचे दाखले देत सामान्य माणूस आपल्या नकळत अंमली पदार्थांच्या विळख्यात कसा सापडतो हे पटवून दिले. सोबतच या धोक्यापासून स्वतः व आपले परिजन यांचे संरक्षण करण्याचे उपायही सांगितले.

त्यांनी आपल्या जीवनातील संघर्षगाथा मांडून विद्यार्थ्यांनी उत्तम आरोग्य संपादन करून नियमित अभ्यास व शिक्षणाची कास धरली तर आई-वडिलांना त्यांच्या अभिमान वाटतो, हे समजावून सांगितले.

या कार्यक्रमाच्या आयोजनात ज्ञानसाधना संस्थेचे सचिव कमलेश प्रधान सर, सहसचिव मानसी प्रधान मॅडम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेश भगुरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सीताराम वाहुळे, प्रशासकीय उपप्राचार्य प्रा.दिनेश जोशी, पर्यवेक्षक प्रा.राजेंद्र वेखंडे, नागरी संरक्षण दल समितीचे प्रा.हरेश्वर भोये, प्रा.किसन धादवड, प्रा.अतुल पाटील यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रल्हाद सोनवणे यांनी केले.

# TRANSLATION OF THE ABOVE NEWS ARTICLE

## Family Ruined by Narcotics: Awareness on Raising Day

Thane – On the occasion of Police Raising Day at Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane, awareness was created among students about the harmful effects of drug abuse, urging them to focus on good health and education.

A guidance lecture was organized for volunteer students on the topic "The Harmful Effects of Drug Abuse" under the initiative of the Civil Defence Unit on the occasion of Police Raising Day. The session was led by Jagdish Gavit, Assistant Police Inspector, under the guidance of Assistant Commissioner of Police, Anti-Narcotics Squad, Thane Branch, Indrajit Karle, and Senior Police Inspector Sanjay Shinde. In his speech, Gavit explained how an ordinary person unknowingly falls into the trap of drugs, using real-life examples from events happening around them. He also shared preventive measures to protect oneself and loved ones from this danger.

He shared his personal life struggles and explained to students that if they maintain good health and consistently focus on studies, they can make their parents proud.

The program received valuable support from Kamlesh Pradhan, Secretary of Dnyanasadhana Institution, Mansi Pradhan, Joint Secretary, and Dr. Ganesh Bhugre, the Principal of the college. Key responsibilities for organizing the program were carried out by the Vice Principal of the Junior College, Prof. Sitaram Wahule, Administrative Vice Principal Prof. Dinesh Joshi, Supervisor Prof. Rajendra Vekhande, Civil Defence Committee members Prof. Hareshwar Bhoye, Prof. Kisan Dhadwad, and Prof. Atul Patil. The event was hosted by Prof. Pralhad Sonawane.

# ACADEMIC YEAR 2020-2021

## (A)

## ILLUMINATING LIVES: SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE STUDENTS CELEBRATE DIWALI WITH THE ELDERLY



**ज्ञानसाधनाची सामाजिक दिवाळी**

दीपश्री जोशी, निर्मला निकेतन

ठाण्याच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी यंदाची दिवाळी सामाजिक भान राखून साजरी केली. कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमास भेट घेतली. भिवंडी येथील स्मित वृद्धाश्रम येथे विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली. हा कार्यक्रम ६ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला होता. ३०पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी यात आपला सक्रिय सहभाग नोंदवला.

वृद्धाश्रमात विद्यार्थ्यांनी मनोरंजनासाठी विविध विषय हाताळून नाट्य सादर केले. तसेच तेथील ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगवेगळ्या प्रकारची गाणी, नृत्यदेखील सादर केले. त्याचप्रमाणे दिवाळीचे आकर्षण असलेला दिवाळी फराळ वाटण्यात आला. ही वृद्धाश्रम भेट विद्यार्थ्यांसाठी मोलाची ठरली. ज्येष्ठ नागरिकांची काळजी कशी घ्यावी, हे विद्यार्थ्यांना उमगले.

**<u>TRANSLATION FOR ABOVE ARTICLE</u>**

**Dnyansadhana's Social Diwali**

This year, the students of Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane, celebrated Diwali with a sense of social responsibility. The students from the college's National Service Scheme (NSS) visited an old-age home. On November 6th, a program was organized at the Smita Old-Age Home in Bhiwandi, where the students showcased their talents. More than 30 students actively participated in this event. Various plays were performed on different topics for the entertainment of the elderly. The students also presented songs and dances for the senior citizens. Additionally, Diwali treats, which are a key attraction of the festival, were distributed. This visit to the old-age home proved to be invaluable for the students, as they learned the importance of caring for the elderly.

**(B)**

# ROTARY YOUTH LEADERSHIP AWARDS CEREMONY HELD IN SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE, THANE



## रोटरी युथ लीडरशिप अवॉर्डस् साजरे

ठाणे, दि.९ (वार्ताहर)- रोटरी क्लब ऑफ ठाणे गार्डन सिटीच्या विद्यमाने नुकताच रोटरी युथ लीडरशिप अवॉर्डस् २०२० (RYLA) या कार्यशाळेचे सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात आयोजन करण्यात आले. यात सुमारे १५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

या कार्यशाळेत मुलांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. सर्वप्रथम रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४२ चे गव्हर्नर डॉ.मोहन चंदावरकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सुप्रसिद्ध मार्गदर्शक जयप्रकाश काब्रा आणि अंजली देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वक्तृत्व स्पर्धा, नाट्यछटा सादरीकरण यातून विद्यार्थ्यांनी विविध कला गुणांचे प्रात्यक्षिक दिले. तज्ज्ञ परीक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यासाठी मार्गदर्शन केले. शेवटी विद्यार्थी, शिक्षक आणि रोटरी सदस्यांनी अतिशय मनोरंजक सांगीतिक कार्यक्रम सादर केले.

विविध स्पर्धांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. सुशील आगवणे आणि सोनाली गोठाल हे विद्यार्थी अनुक्रमे रोटरी युथ लिडरशिप अवॉर्डस् किंग व क्विन घोषित करण्यात आले.

कार्यशाळेत प्राचार्य मराठे आणि मान्यवर प्राध्यापक उपस्थित होते. रोटरी तर्फे अध्यक्ष मुकुंद गद्रे, असि. गव्हर्नर संग्राम जोशी, रोटरी क्लब ऑफ ठाणे गार्डन सिटीचे सर्व सदस्य उपस्थित होते. बक्षीस समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून ठाण्यातील ज्येष्ठ आणि प्रथितयश डॉ.भानुशाली उपस्थित होते. मंगेश वैद्य यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. वैशाली भावीगड्डा आणि सहकाऱ्यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले.

या कार्यशाळेतून खूप काही शिकायला मिळाले ही भावना जवळपास सर्वच विद्यार्थ्यांनी बोलून दाखवली. रोटरी क्लब ऑफ ठाणे गार्डन सिटीने सलग चौथ्या वर्षी अशी कार्यशाळा आयोजित केली.

**TRANSLATION FOR THE ABOVE ARTICLE**

**Rotary Youth Leadership Awards Celebrated**

The Rotary Youth Leadership Awards (RYLA) 2020 workshop was recently organized at Satish Pradhan Dnyanasadhana College by the Rotary Club of Thane Garden City. Around 150 students participated in this event. Various competitions were held for the students during the workshop. The event was inaugurated by Dr. Mohan Chandavarkar, Governor of Rotary District 3942. Renowned mentors Jayprakash Kabra and Anjali Deshpande guided the students. The students demonstrated their talents through elocution competitions and dramatic performances. Expert judges provided feedback and guidance to the students. Towards the end, students, teachers, and Rotary members presented a highly entertaining musical program. Awards were given to the outstanding students from various competitions. Students Sushil Agavane and Sonali Gothal were declared the Rotary Youth Leadership Awards King and Queen, respectively. The workshop was attended by Principal Marathe, along with esteemed professors. President Mukund Gadre, Assistant Governor Sangram Joshi, and all members of the Rotary Club of Thane Garden City were present at the event. The prize distribution ceremony had Dr. Bhanushali, a prominent and respected personality from Thane, as the chief guest. Mangesh Vaidya hosted the program, while Vaishali Bhavigadda and her team organized the workshop.

Nearly all the students expressed that they learned a great deal from the workshop. This was the fourth consecutive year that the Rotary Club of Thane Garden City had organized such a workshop.

(C)

## INNER MOTIVATION ESSENTIAL FOR SOCIAL WORK, SAYS DR. GIRISH KULKARNI

In his lecture at Satish Pradhan Dnyansadhana College's Guruvarya S. V. Kulkarni Series, Dr. Girish Kulkarni emphasized the need for internal motivation in social work, requiring personal sacrifice and alignment with traditional social frameworks. He shared insights into the founding of his NGO, Snehalaya, which began in 1989 to support marginalized communities and now aids various disadvantaged groups. Dr. Kulkarni stressed the importance of determination and resilience among youth, highlighting Snehalaya's expanded role in addressing critical social issues.



‘समाजकार्यासाठी आंतरिक प्रेरणा हवी’

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

'सामाजिक क्षेत्रात काम करताना वैयक्तिक ऐहिक जीवनाशी फारकत घ्यावी लागते. असंख्य अडचणींचा सामना करताना परंपरागत सामाजिक चौकट आणि नकारात्मक व सकारात्मक शासनप्रणालीशी ताळमेळ साधता आला पाहिजे. त्यामुळे सामाजिक क्षेत्रात काम करण्यासाठी आंतरिक प्रेरणा महत्त्वाची आहे,' असे प्रतिपादन डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी केले. ठाण्याच्या ज्ञानसाधना महाविद्यालयातील एनएसएस विभाग आयोजित गुरुवर्य स. वि. कुलकर्णी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प 'स्नेहालय' या स्वयंसेवी संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्या मुलाखतीने रंगले. प्रा. मनीषा राजपूत यांनी कुलकर्णी यांना बोलते केले.

डॉ. गिरीश कुलकर्णी यांचे आजोबा गणेश देशपांडे हे स्वातंत्र्यसेनानी होते. त्यामुळेच अच्युतराव पटवर्धन, सेनापती बापट यांसारख्या सामाजिक चळवळीतील दिग्गजांना त्यांना जवळून पाहता आले. कुलकर्णी यांचे आई-वडील क्रीडा व शिक्षण क्षेत्रात कार्यरत असल्याने एकंदरितच संस्कारसमृद्ध घर आणि समाजभान जपणारे विचारप्रवाह या वातावरणात वाढल्याने समाजसेवेची आंतरिक प्रेरणा लहान वयातच वृद्धिंगत झाल्याचे ते सांगतात. अहमदनगरमधील चित्रागल्लीतील भयाण, विदारक वास्तव व मित्राच्या घरी पाहिलेली स्त्रियांना पिढीजात शरीरविक्रयाचा व्यवसाय करायला लावणारी जाचक प्रथा यांमुळे निर्माण झालेल्या उद्विग्न मनोव्यथेतूनच 'स्नेहालय' संस्थेचा जन्म झाला, असे डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

**डॉ. गिरीश कुलकर्णी यांचे प्रतिपादन**


१९८९मध्ये सुरुवातीला केवळ शरीरविक्रय व्यवसाय करणाऱ्या वस्तीतील महिला व बालकांच्या सबलीकरण आणि सक्षमीकरण या ध्येयाने स्थापन झालेली 'स्नेहालय' ही संस्था आज भटक्या जाती-जमाती, इतर दुर्बल घटक, शेतकरी, ऊसतोड कामगार, एड्सपीडीत अशा अनेक वंचित घटकांचे प्रश्न हाताळत आहे. संस्थेच्या वसतिगृहात आज ४०० विद्यार्थी राहत असून त्यांच्या शिक्षणाची, संतुलित आहार आणि आरोग्याची उत्तम सोय संस्था करत आहे. करोनाकाळात करोनाग्रस्तांवर अल्पदरात उपचार करण्यात आले. करोना काळजी केंद्र उभारून तेथे रुग्णांवर मोफत उपचार करण्यासह त्यांच्या खाण्यापिण्याचीही उत्तम सोय करण्यात आली. प्रसंगी स्वतःचा जीवही धोक्यात घालून आपले उद्दिष्ट पूर्ण करण्याची मानसिकता तरुणांमध्ये दृढ व्हायला हवी, असे मत यावेळी कुलकर्णी यांनी व्यक्त केले. व्याख्यानमालेच्या नियोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान, खजिनदार सतीश शेठ यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले.




**Link:** [https://www.youtube.com/watch?v=XCt3Pj7LxCE](https://www.youtube.com/watch?v=XCt3Pj7LxCE)

**(D)**

## <u>SPDC GLORIOUS 40 - GURUVARYA S. V. KULKARNI HONORARY LECTURE SERIES: SECOND SESSION</u>




**Link:** [https://www.youtube.com/watch?v=xwEz0qgJZ6E](https://www.youtube.com/watch?v=xwEz0qgJZ6E)

The session by Suhas Khamkar, a renowned bodybuilder and fitness expert, was a key highlight of the Guruvarya S. V. Kulkarni Honorary Lecture Series. Khamkar shared insights into his journey, the discipline required in bodybuilding, and the importance of fitness in everyday life. His motivational talk inspired the audience to pursue their goals with determination and perseverance.

# ACADEMIC YEAR 2021-2022

**(A)**

## HONOURING HEROES FOR THEIR SERVICE TO FLOOD VICTIMS ON INDEPENDENCE DAY





**पूरग्रस्तांसाठी काम करणाऱ्या तरुणांचा स्वातंत्र्यदिनी सन्मान**

मिशन कोकण टीमला ज्ञानसाधना आणि झेपकडून गौरवपत्र

ठाणे : कोकणातील पुरग्रस्तांना मदतीचा हात देणाऱ्या मिशन कोकण 2021 च्या टीमचे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय व झेप प्रतिष्ठान यांच्यातर्फे गौरवपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी ज्ञानसाधना महाविद्यालयाचे कुटुंबप्रमुख मानसी प्रधान व कमलेश प्रधान, झेप प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष विकास धनवडे, मिशन कोकण टीमच्या प्रमुख, पत्रकार प्रज्ञा म्हात्रे, आम्ही शिवभक्त परिवाराचे दीपेश दळवी, मिशन कोकण टीमचे सेजल रांगळे, अजय भोसले, रोहन पाठारे, कौशिक साटे, पत्रकार प्रज्ञा सोपारकर, कपिल मांढरे यांच्यासह एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना गौरवपत्र देण्यात आले.

कमलेश प्रधान यांनी पूरग्रस्तांसाठी काम केलेल्या सर्व टीमचे अभिनंदन केले तर धनवडे यांनी झेप प्रतिष्ठानची माहिती देत पूरग्रस्त भागात आलेले अनुभव कथन केले. सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात रविवारी सकाळी हा गौरव सोहळा पार पडला. यावेळी ज्ञानसाधना ठाणे सोसायटीचे अध्यक्ष सतीश प्रधान, जनरल सेक्रेटरी कमलेश प्रधान, खजिनदार सतीश सेठ, विश्वस्त श्रीकांत देवळे, प्राचार्य डॉ. हेमंत चित्ते, झेप प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विकास धनवडे आदी उपस्थित होते. सुरुवातीला ध्वजवंदन करून त्यानंतर एनसीसीच्या विद्यार्थ्यांचे संचलन झाले तर एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून कोरोनाच्या नियमांविषयी जनजागृती केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहन पाठारे याने केले.



लोकमत

**पूरग्रस्तांसाठी काम करणाऱ्या तरुणांचा केला सन्मान**

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : कोकणात आलेल्या महापुरामुळे कोकणवासीयांचे मोठे नुकसान झाले. या पुरात अडकलेल्या पूरग्रस्तांसाठी मदत गोळा करून ती त्यांच्यापर्यंत पोहोचविणाऱ्या मिशन कोकण २०२१ च्या टीमचे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय व झेप प्रतिष्ठान यांच्यातर्फे गौरवपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात रविवारी सकाळी हा गौरव सोहळा पार पडला. यावेळी ज्ञानसाधना ठाणे सोसायटीचे अध्यक्ष सतीश प्रधान, जनरल सेक्रेटरी कमलेश प्रधान, खजिनदार सतीश सेठ, विश्वस्त श्रीकांत देवळे, प्राचार्य डॉ. हेमंत चित्ते, झेप प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विकास धनवडे आदी उपस्थित होते. यावेळी ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्रमुख मानसी प्रधान व कमलेश प्रधान, मिशन कोकण टीमच्या प्रमुख प्रज्ञा म्हात्रे, झेप प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विकास धनवडे, आम्ही शिवभक्त परिवाराचे दीपेश दळवी, सेजल रांगळे, अजय भोसले यांच्यासह टीमचे सदस्य आणि एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना गौरवपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहन पाठारे याने केले.

Hello Thane
Page No. 2 Aug 17, 2021
Powered by: erelego.com

The news article highlights an event where individuals were honoured on Independence Day for their efforts in assisting flood-affected victims. The Mission Konkan Team received awards for their dedicated service. This recognition emphasizes their significant contributions to society.

**(B)**

**RURAL DEVELOPMENT CAMP AND EDUCATIONAL SUPPLIES DISTRIBUTION AT JILHA PARISHAD SCHOOL, ATKOLI, PADGHA, BHIWANDI**




**Link: [https://youtu.be/9ssPSnVemEE](https://youtu.be/9ssPSnVemEE)**

**(C)**

**COVID VACCINATION DRIVE HAPPENED IN SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE, THANE.**



**Link: [https://www.facebook.com/share/v/tZPAN99NVGE6oQWr/?mibextid=oFDknk](https://www.facebook.com/share/v/tZPAN99NVGE6oQWr/?mibextid=oFDknk)**

**(F)**

**<u>MINISTER EKNATH SHINDE INSPECTS PROPOSED QUARANTINE CENTERS AT NEW HORIZON SCHOOL AND SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE IN THANE</u>**

In this image, Maharashtra Minister Eknath Shinde is seen inspecting proposed quarantine centers at New Horizon School and Satish Pradhan Dnyanasadhana College, which have been set up to accommodate COVID-19 patients in Thane.




**Link:** [https://www.facebook.com/share/v/bkPkmuGrF3g5PB4R/?mibextid=oFDknk](https://www.facebook.com/share/v/bkPkmuGrF3g5PB4R/?mibextid=oFDknk)

**(G)**

**VACCINATION DRIVE FOR STUDENTS CONDUCTED AT SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE, THANE**

In October 2021, a vaccination drive was organized for students at Satish Pradhan Dnyanasadhana College in Thane as part of efforts to combat COVID-19. The drive, covered by TV9 Marathi, was conducted with the support of the Thane Municipal Corporation to ensure students received their vaccinations, facilitating a safer environment for the reopening of colleges amidst the pandemic.




**Link:** [https://fb.watch/ulo2YpRKJu/](https://fb.watch/ulo2YpRKJu/)

**(H)**


**THANE MAYOR NARESH MHASKE OVERSEES VACCINATION CAMP FOR COLLEGE STUDENTS**




Thane Mayor Naresh Mhaske visited a vaccination camp organized by Thane Municipal Corporation at Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane urging students to participate in the drive for safe college reopening amidst COVID-19.

**(I)**


**<u>COVID-19 VACCINATION DRIVE AT SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE</u>**




Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane, successfully vaccinated 5,975 students aged 15 to 18 during a COVID-19 vaccination drive, including 5715 first and second doses and 260 doses under the Agnirath Mission Youth Health Program.

**(J)**

**VACCINATION UPDATE AT SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE**



Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane

11 Jan 2022 ·

#सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे

15 ते 18 विद्यार्थींचे लसीकरण...

03.01.2022 - 340 students are vaccinated.
04.01.2022 - 500 students are vaccinated.
05.01.2022 - 420 students are vaccinated.
06.01.2022 - 320 students are vaccinated.
07.01.2022 - 460 students are vaccinated.
08.01.2022 - 500 students are vaccinated.
09.01.2022 - *SUNDAY*
10.01.2022 - 320 students are vaccinated.
11.01.2022 - 100 students are vaccinated.

आतापर्यंत आपल्या कॉलेजच्या लसीकरण केंद्रावर *2960* विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण झाले आहे#

You, Kamlesh Pratibha Satish Pradhan and 22 others

Like Comment Send Share

From January 3rd to 11th, 2022, Satish Pradhan Dnyanasadhana College vaccinated 2,960 students aged 15 to 18 as part of their ongoing COVID-19 vaccination campaign.

# ACADEMIC YEAR 2022-2023

**(A)**

**NEW LEADERSHIP TEAM ELECTED IN YIN THANE DISTRICT ELECTIONS**

The YIN Leadership Development Program concluded with the election of new district representatives, where Pratham Gupta was chosen as District President and Shreya Kolwankar as Chairperson. The event highlighted the importance of leadership development in students, with faculty expressing confidence in the newly elected team's ability to lead and inspire.



## 'यिन' ठाणे जिल्हाध्यक्षपदी प्रथम गुप्ता

### कार्याध्यक्षपदी श्रेया कोळवणकर, महापौरपदी आकाश दुधकरची निवड

ठाणे, ता. १८ : 'सकाळ' माध्यम समूहाच्या 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क'तर्फे (यिन) लीडरशिप डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील महाविद्यालयात मतदानाद्वारे पदाधिकाऱ्यांची निवड शुक्रवारी (ता. १७) करण्यात आली. यात यिनच्या जिल्हाध्यक्षपदी एन. एल. दालमिया कॉलेजचा प्रथम गुप्ता आणि कार्याध्यक्षपदी ज्ञानसाधना कॉलेजची श्रेया कोळवणकर यांची निवड झाली.

निवड प्रक्रियेत महापौरपदी बी. के. बिर्ला कॉलेजचा आकाश दुधकर आणि जिल्हा परिषद अध्यक्षपदी एन. एल. दालमिया कॉलेजची साक्षी सिंह यांची निवड झाली. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आणि कार्याध्यक्षांना राज्यस्तरावर यिन शॅडो मंत्रिमंडळात मंत्रिपदाची सुवर्णसंधी मिळणार आहे. या निवड प्रक्रियेसाठी ६० गुणांची लेखी परीक्षा व ४० गुणांची व्यक्तिमत्त्व व कौशल्य चाचणी मुलाखतीद्वारे घेण्यात आली. यात उमेदवारांचे गुणांकन करून टॉप फाईव्ह उमेदवार निश्चित करण्यात आले. यातून अंतिम दोन उमेदवार निवडून त्यांना इतर महाविद्यालय अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांनी केलेल्या मतदानाद्वारे अंतिम निवडी जाहीर करण्यात आल्या.

ठाणे : 'यिन' जिल्हा पदाधिकाऱ्यांची निवडीप्रसंगी नूतन पदाधिकारी व परीक्षक.

YIN Leadership Development Program Ministry

**'यिन'चे पदाधिकारी**

- जिल्हाध्यक्ष : प्रथम गुप्ता
- कार्याध्यक्ष : श्रेया कोळवणकर
- उपाध्यक्ष : शुभम सैद
- सरचिटणीस : साक्षी दिवाण
- प्रवक्ता : आदित्य चन्ने
- महापौर : आकाश दुधकर
- जिल्हा परिषद अध्यक्ष :साक्षी सिंह
- सभापती : संकेत बांद्रे
- उपसभापती : सिद्धेश तेलंगे
- गटनेता : अंजली ठाकूर

यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्कच्या माध्यमातून आपल्यातील नेतृत्वगुण आणि सर्वांगीण विकास करता येईल, अशी भावना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये आहे. उद्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी यिनसारख्या व्यासपीठात जोडले जावेत, अशी आशा करतो.
- प्रा. डॉ. रामकिशन भिसे

'सकाळ' माध्यम समूहाचे यिन म्हणजे नवीन तरुण पिढीला राजकारणात आणि समाजकारणात येण्याआधीची पहिली पायरी आहे. यिनसाठी जिल्हा व राज्यस्तरीय नेतृत्वासाठी अध्यक्ष-उपाध्यक्षांची निवड करण्यात आली. या निवडप्रक्रियेत युवकांची जिद्द दिसून आली.
- समाधान काशीद, ॲडव्होकेट

यिन उपक्रमाद्वारे तरुणांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी जे उपक्रम घेतले जातात, ते उत्तमच असतात. यिनच्या पुढील वाटचालीसाठी तसेच निवडून आलेल्या नवनिर्वाचित अध्यक्ष-उपाध्यक्षांना शुभेच्छा!
- पांडुरंग देवरे, उद्योजक

**(B)**

**EMPOWERING FUTURE LEADERS: THE CRUCIAL ROLE OF MENTORSHIP HIGHLIGHTED AT YOUNG INSPIRATORS NETWORK CONVENTION**

A recent district-level convention organized by the Young Inspirators Network highlighted the crucial role of mentorship in guiding the younger generation towards a promising future. The event, attended by students, educators, and industry experts, underscored the need for strong support systems to help young individuals navigate their careers and personal growth. Speakers emphasized that national development depends on collective upliftment through mentorship and shared learning, aiming to empower youth from diverse backgrounds with the resources, guidance, and encouragement needed to reach their full potential. This initiative is part of a broader effort to create a platform where young minds can gain insights from industry veterans, fostering a community of leaders equipped to contribute meaningfully to society.



# देशाला होतकरू तरुण पिढीची गरज

## सकाळ यिन जिल्हास्तरीय अधिवेशनात विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन

YOUNG INSPIRATORS NETWORK

ठाणे, ता. २६ (वार्ताहर) : यशस्वी जीवनासाठी वाटचाल करताना राज्य आणि देशाचा विकास कसा होईल, या दृष्टीने तरुणाईने विचार करणे आवश्यक आहे. अशा होतकरू तरुण पिढीची सध्या देशाला गरज असून त्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यासाठी सकाळ यिनच्या ठाणे जिल्हास्तरीय अधिवेशनाचे आयोजन ठाण्याच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात करण्यात आले होते. या वेळी स्वच्छता, [illegible], कचरा, प्लास्टिक अशा विविध विषयांवर मते मांडताना योगा व ध्यान, आर्थिक साक्षरता, उद्योजकता कौशल्ये, सर्जनशील विचार, भावनिक व मानसिक आरोग्य, सेवा आदी एकूण ६ मूलमंत्रांवर सखोल चर्चा करण्यात आली. आगामी उपक्रमांचे नियोजनही करण्यात आले.

जिल्हा अधिवेशनात शिक्षण सहायक संचालक शेषराव बडे यांनी शिक्षणाचे महत्त्व आणि शिक्षणाने आत्मनिर्भर होण्यासाठी मार्गदर्शन केले. राजकारण हे पैसे कमविण्याचे साधन नसून समाजाचे आपण काही देणे लागतो, या भावनेतून तरुणांनी विचार केला पाहिजे, असे प्रदेशाध्यक्ष प्रवक्त्या मृणाल पेंडसे यांनी पटवून दिले. उद्योजक सुयोग मालुसरे यांनी आपल्या आवडीनुसार क्षेत्र घेऊन ज्यात आपल्याला आनंद वाटतो, ते स्वप्न उराशी बाळगून तेच साध्य करावे, असे सांगितले.

ठाणे : सकाळ यिनच्या ठाणे जिल्हास्तरीय अधिवेशनात उपस्थित असलेले विद्यार्थी.

जीवनात आपल्याला काय बनायचे आहे, काय शिकायचे आहे, हे लक्षात घेऊन आपण शिक्षण घ्यायला पाहिजे. शिक्षण घेऊन मी आत्मनिर्भर झालो तरच देश, राज्य विकास करेल. शिक्षणाने विद्यार्थ्यांची जडणघडण होत असते. ज्ञानात भर पडायची असेल, तर पुस्तकवाचन केलेच पाहिजे. आताच्या वयात अवांतर वाचनाची सवय तुम्हाला भविष्यात इतरांपेक्षा चार पावले पुढे जाण्यासाठी मार्गदर्शक ठरतील.
- शेषराव बडे,
शिक्षण सहायक संचालक

सकाळ यिन जिल्हास्तरीय अधिवेशनात नव्या पिढीसाठी नेतृत्व विकासाची सुवर्णसंधी दिल्याबद्दल सकाळचे आभार. उद्योगात अनेक आव्हाने असतात. गेल्या बावीस वर्षांपासून आव्हाने झेलत मी व्यवसाय करीत आहे. आजच्या मुलांनी सर्वप्रथम शिक्षण घ्यायला हवे. व्यवसाय हा प्रत्येक गोष्टीत असतो. चांगल्या-वाईट अनुभवावरून माणूस शिकत असतो आणि आपल्या उद्योगाचे साम्राज्य शून्यातून निर्माण करीत असतो.
-सुयोग मालुसरे, उद्योजक

राजकारण वाईट नाही. तरुणांनी पुढे यायला हवे. राजकारण म्हणजे पैसे कमवण्याची स्रोत नाही. राजकारणात काम करत असताना किंवा लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना लोकांना प्रशासनाचे चांगले वाईट अनुभव येतात. राजकारणात एकदम कडक राहूनही चालत नाही. संयम हवा असतो, मग अधिकारी वर्गही सहकार्य करतात. आजच्या स्थितीला सोशल मीडिया हा खूप महत्त्वाचा भाग आहे. संधीचे सोने कसे करायचे हे समजून घ्या.
- मृणाल पेंडसे, प्रवक्त्या

**(C)**

**EMPOWERING YOUTH FOR NATION'S DEVELOPMENT:**

**INSIGHTS FROM THE SAKAL YOUNG INSPIRATOR NETWORK CONVENTION**

The Sakal Young Inspirator Network recently organized a district-level convention focused on guiding the youth for the nation's development. Experts from various fields, including Sandeep Kadu, Sandeep Kachare, and Prashant Pawar, emphasized the importance of proper guidance, adapting to changing technologies, and focusing on high aspirations. The event, inaugurated by the chief guests, concluded with gratitude extended by Shruti Kunte, highlighting the need for a well-informed and motivated younger generation.



राज्यभरात 'यिन'च्या महाविद्यालयीन निवडणुकीचे पडघम

उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात; तीन टप्प्यांत निवडणुका

YIN Leadership Development Program Ministry

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २० : 'सकाळ माध्यम समूह' आयोजित यिन नेतृत्व विकास कार्यक्रम अंतर्गत 'यिन' निवडणूक प्रक्रिया ९ जानेवारी २०२३ पासून तीन टप्प्यांमध्ये होत आहे. आजपासून ऑनलाइन उमेदवारी अर्ज भरण्यास राज्यभरात सुरुवात झाली आहे. महाविद्यालयीन तरुणांमध्ये सर्वांत चर्चिली जाणारी ही निवडणूक प्रक्रिया यावर्षी ऑफलाइन होत असून ऑनलाइन अर्ज दाखल करता येणार आहेत. पहिल्या टप्प्याचे मतदान ९ जानेवारी २०२३ रोजी होणार आहे.

राज्यभरातील विविध महाविद्यालयांतील उमेदवार अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात 'यिन' निवडणुकीत सहभागी होत आहेत. या संपूर्ण प्रक्रियेत महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच विविध शाखांचे विभागप्रमुख विद्यार्थ्यांना 'यिन' निवडणुकीबद्दल मार्गदर्शन करत असतात. राज्यातील सर्व महाविद्यालयात पोस्टर, बॅनर आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून निवडणुकीची माहिती प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सकाळ माध्यम समूहाचे 'यिन' व्यासपीठ सज्ज झाले आहे.

राज्यातील विविध महाविद्यालयांत विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करताना त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे महत्त्वपूर्ण काम 'सकाळ' माध्यम समूहाचे 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क' अर्थात (यिन) या व्यासपीठाद्वारे केले जाते. मतदान प्रक्रियेसाठी ॲपच्या साह्याने ऑनलाइन उमेदवारी अर्ज दाखल केले जातात. मतदान करण्याअगोदर 'यिन'चे ॲप प्रत्येक मतदाराने मोबाईल मध्ये डाऊनलोड करणे गरजेचे आहे. मतदानावेळी ॲपवर स्वतःचे प्रोफाइल दाखविणे व महाविद्यालयाचे ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. महाविद्यालयातच मतपत्रिकेद्वारे पसंतीच्या उमेदवाराला मतदान करता येणार आहे.

**नवीन 'यिन' मंत्रिमंडळाची स्थापना**

३१ जानेवारी, १ फेब्रुवारी आणि २ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत वाय. बी. चव्हाण सभागृह, मुंबई येथे होणार आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

- रायगड + नवी मुंबई - गणेश घोलप - ८४५९८७१६६०
- मुंबई - संदीप पालवे - ९०८२१५४०६०
- ठाणे - अभिषेक भोसले - ८४५०९१३८८९

**यिन निवडणुकीच्या तारखा पुढीलप्रमाणे**

**पहिली फेरी**
९ जानेवारी २०२३ (शहर)
१२ जानेवारी २०२३ (ग्रामीण)

**दुसरी फेरी**
१६ जानेवारी २०२३ (शहर)
१९ जानेवारी २०२३ (ग्रामीण)

**तिसरी फेरी**
२३ व २४ जानेवारी २०२३
(उर्वरित सर्व महाविद्यालये)

**(E)**

## A 'GREEN' SOLUTION TO THE WASTE PROBLEM: EXPERIMENTAL PROJECT LAUNCHED IN THANE

Satish Pradhan Dnyanasadhana College played a key role in Thane Municipal Corporation's waste management initiative by organizing five training workshops. Volunteers from 'R Nisarg' and municipal officials monitor the project's progress. The college's NCC and NSS students visited 750 homes to educate residents on the importance of waste segregation and its benefits, fostering environmental awareness in the community.



# कचरा प्रश्नाचे 'हरित' उत्तर

## ठाण्यात प्रायोगिक तत्त्वावर प्रकल्प कार्यान्वित

प्रशांत मोरे, ठाणे

- पोखरण रस्त्यावरील ७५ सोसायट्यांतील पाच हजार कुटुंबांचा समावेश
- ओला, सुका आणि घातक कचऱ्याचे वर्गीकरण

महानगरीय जीवनशैलीत अत्यंत जटील समस्या ठरलेल्या कचऱ्याच्या प्रश्नावर शास्त्रशुद्ध पद्धतीने तोडगा काढून टप्प्याटप्प्याने त्याची अंमलबजावणी करण्याची मोहीम गेल्या महिन्यापासून ठाणे महापालिका प्रशासनाने 'आर निसर्ग' या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने राबविण्यास सुरुवात केली आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात सध्या पोखरण रस्ता क्रमांक दोनलगत असलेल्या ७५ सोसायट्यांमधील पाच हजार कुटुंबांचा समावेश करण्यात आला आहे. या पाच हजार कुटुंबांकडून मिळणाऱ्या सर्व कचऱ्याचे प्रक्रिया आणि पुनर्वापराद्वारे व्यवस्थापन केले जात आहे. टप्प्याटप्प्याने संपूर्ण शहरात ही मोहीम राबवली जाणार असून डम्पिंग ग्राऊंडशिवाय कचऱ्याचे यशस्वीरित्या व्यवस्थापन करून ठाणे शहर स्मार्ट सिटीच्या दिशेने दमदार पाऊल टाकेल, असा विश्वास या मोहिमेत सहभागी झालेल्या कचरा व्यवस्थापन तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

'फॉलो द मंकी' असे या मोहिमेचे नाव असून २० जानेवारीपासून प्रायोगिक तत्त्वावर या विभागातून कचरा संकलीत केला जात आहे. सध्या ओला आणि सुका अशा दोन प्रकारचा कचरा गोळा केला जात असून १ मार्चपासून घातक कचऱ्याचेही स्वतंत्रपणे संकलन केले जाणार आहे. त्यासाठी 'आर निसर्ग'चे पदाधिकारी सध्या संबंधित सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांना मोहिमेविषयी प्रशिक्षण देत आहेत. आतापर्यंत पाच प्रशिक्षण कार्यशाळा झाल्या आहेत. गेल्या आठवड्यात सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील 'एनसीसी' आणि 'एनएसएस' च्या शंभर विद्यार्थ्यांनी या सोसायट्यांमध्ये या मोहिमेविषयी जनजागृती केली. त्यांनी ७५० घरांमध्ये जाऊन या कचरा वर्गीकरण मोहिमेचे वेगळेपण आणि वैशिष्ट्य नागरिकांना समजावून सांगितले. तसेच त्यामुळे होणारे लाभही त्यांच्या लक्षात आणून दिले.



"'आर निसर्ग'चे स्वयंसेवक आणि महापालिका अधिकारी नियमितपणे या प्रकल्पाची देखरेख करीत आहेत. पोखरण रस्त्यावरील प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वित झाला की अन्य विभागातही अशा प्रकारे कचरा संकलित केला जाणार आहे. प्रत्येक नागरिकाने या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद द्यावा.

- डॉ. लता घनश्यामनानी, आर निसर्ग, ठाणे

**मटा पुढाकार**

आपण आपल्या सोसायट्या किंवा लोकवस्तीमधील कचरा शून्यावर आणण्यासाठी, डम्पिंगमुक्तीसाठी किंवा कचरावर्गीकरणासाठी काय प्रयत्न करता ? ठाण्यातील डम्पिंग ग्राऊन्डचे ढीग कमी करण्यासाठी तुम्ही काय योजना राबवता आहात, तुमच्या काय कल्पना आहेत, ते आम्हाला जरूर पाठवा. त्यावर आपला नाव व संपर्कही लिहा. mtthaneplus@timesgroup.com

### या सोसायट्यांचा सहभाग

टाटा ग्लेंडेल, गौरव, मंदार, गुलमोहर, पोगम, चंपक, फलाश, प्राची, चंदन,औदुंबर, वसंत विहार, अनंत, त्रिवेणी, जाई जुई शाल्मली, कांचन, वैजयंता सोसायटी,लोकपुरम, सोनचाफा, रो-हाउस, पंचवटी, अश्वथा, अर्जुन सोसायटी,एन्क्लेव्ह सोसायटी, सिद्धाचल फेज १ ते ८, जास्मिन टॉवर, महावीर, मिलेनियम,केतकी, व्होल्टास कॉलनी या सोसायट्यांचा पहिल्या टप्प्यातील मोहिमेत सहभाग आहे.

### कचऱ्याची व्यवस्था

या मोहिमेत संकलीत होणारा ओला कचरा ऋतू पार्क येथील खत प्रकल्पात तर सुका कचरा ठाणे पूर्व विभागात समर्थ भारत केंद्रातील कचरा व्यवस्थापन केंद्रात दिला जातो. सध्या दोन्ही प्रकारचा मिळून दररोज पाच टन कचरा संकलीत केला जात आहे. १ मार्चपासून संकलीत होणारा घातक कचरा तळोजा येथील प्रक्रिया केंद्रात दिला जाणार आहे.

### सेवकांच्या आरोग्याची काळजी

येत्या सोमवारपासून सहभागी सोसायट्यांमधील सफाई कर्मचारी आणि घरकाम करणाऱ्या सेवकांसाठी ओळखपत्र दिले जाईल. या ओळखपत्राद्वारे त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना खासगी रुग्णालयात ५० टक्के सवलतीत औषधोपचार मिळणार आहेत. तसेच रुग्णालयात बिलात ३० टक्के सवलत मिळेल.

### मोहिमेसाठी खास गाणे

या मोहिमेत दोन घंटागाड्या वापरण्यात येत असून त्या खास सुशोभित करण्यात आल्या आहेत. या मोहिमेसाठी बनविण्यात आलेले 'चला ठाणे बदलूया' हे गाणे वाजवीत या घंटागाड्या सोसायट्यांमधून कचरा संकलीत करतात. ओला आणि सुका कचरा स्वतंत्र घंटागाडीमध्ये संकलीत केला जातो.

**(F)**

**TROLLERS DISRUPT HUMAN COMMUNICATION**

At Satish Pradhan Dnyanasadhana College, director Ravi Jadhav discussed the increasing trend of movie trolling and its impact on communication, emphasizing the importance of self-confidence and the value of audience feedback in the creative process. He shared insights from his films like ‘Natrang’ and ‘Timepass’. Prof. Namdev Jadhav delivered a lecture on ‘Shivaji: The Management Guru’, highlighting Shivaji Maharaj's exceptional management skills admired even by foreigners. The event was attended by the college's leadership and faculty members.



# ‘ट्रोलर्स माणसांत होणारा सुसंवाद नष्ट करतात’

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** सध्या चित्रपटांवर विनाकारण ट्रोलिंग करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. असे ट्रोलर्स स्वत:हूनच माणसाशी माणसाचा होणारा सुसंवाद नष्ट करतात. मी अशांना कायमचे ‘ब्लॉक’ करण्याचा सुंदर खेळ खेळत राहतो, असे मत दिग्दर्शक रवी जाधव यांनी व्यक्त केले.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात गुरूवर्य स. वि. कुलकर्णी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प शुक्रवारी जाधव यांनी ‘माझ्या कला जाणिवेचा प्रवास’ या विषयावर गुंफले. ज्येष्ठ लेखिका डॉ. प्रज्ञा पवार यांनी त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी जाधव म्हणाले की, आपण जसे आहोत तसे उत्कृष्ट आहोत. आत्मविश्वास बाळगणे महत्त्वाचे, पण अतिआत्मविश्वास नको. कोणतीही कलाकृती प्रेक्षकांसमोर सुबकतेने मांडण्यासाठी आवश्यक वेळ देणे महत्त्वाचे आहे, असा कानमंत्र त्यांनी या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या कलावंतांना दिला. आजही एखादी नवीन कलाकृती प्रदर्शित होण्यापूर्वी अगदी पूर्वीसारखीच धाकधूक असते. रसिकांच्या अभिप्रायाचीही वाट पाहत असतो. यावेळी जाधव यांनी ‘नटरंग, बायोस्कोप, बालक-पालक, न्यूड, टाइमपास’ या चित्रपटांच्या निर्मितीची व दिग्दर्शनाची प्रक्रिया प्रेक्षकांपर्यंत पोहोचविली.

दुसरे पुष्प प्रा. नामदेव जाधव यांनी ‘शिवाजी द मॅनेजमेंट गुरू’ या विषयावर गुंफले. शिवाजी महाराजांच्या उल्लेखनीय व्यवस्थापनावर भाष्य करताना त्यांनी अनेक उदाहरणे दिली. शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन तंत्र मुघलच काय, इंग्रज, पोर्तुगीजांनाही उलगडता आले नव्हते. परकीयांनाही हेवा वाटेल, असे स्वराज्य छत्रपतींनी उभारले असल्याचे विवेचन जाधव यांनी केले. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान, सहसचिव मानसी प्रधान, खजिनदार सतीश शेठ, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे आणि अन्य प्राध्यापक उपस्थित होते.

**(G)**

**<u>THANE DISTRICT SURGEON ENCOURAGES YOUTH TO CONTRIBUTE POSITIVELY DURING INDEPENDENCE AND YOUTH DAY CELEBRATIONS</u>**

Dr. Kailas Pawar, the District Surgeon of Thane, urged youth to channel their energy positively for the country's benefit during a celebration marking the Amrit Mahotsav of Independence and International Youth Day at the District General Hospital. The event included a flag-off for a morning rally and a street play by students to raise awareness about HIV/AIDS. Key figures such as Dr. Suresh Mahawarkar and members of various organizations participated in the activities.



पुढारी

# युवकांनी आपली उर्जा देशहितासाठी वापरावी - डॉ. कैलास पवार

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

युवकांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून, आपली उर्जा चांगल्या कार्यासाठी व देशहितासाठी खर्च करावी, असे आवाहन ठाणे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी केले.

ठाणे जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षाच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व आंतरराष्ट्रीय युवा दिन शुक्रवारी विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. पवार अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हा सामान्य रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी (एआरटी केंद्र) डॉ. सुरेश महावरकर, राज्य एड्स नियंत्रण सोसायटीच्या सायली विचारे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी रतन गाढवे, जिल्हा पर्यवेक्षक अशोक देशमुख, निलिमा पाटील व मान्यवर उपस्थित होते.

**आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त जिल्हा सामान्य रूग्णालयात सकाळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार व वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश महावरकर यांनी प्रभात फेरीला हिरवा झेंडा दाखवला. ही फेरी जिल्हा सामान्य रूग्णालय, पोस्ट, जिल्हाधिकारी कार्यालयामागे कोर्ट नाका मार्गे काढण्यात आली. या फेरीचा समारोप जिल्हा रूग्णालयात झाली. या फेरीत जोशी - बेडेकर, एन के टी बा ना बांदोडकर आर जे. ठाकूर, सतीश प्रधान ज्ञानसाधना, परिचारिका महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले आहे. स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थितीत होते. यावेळी विद्यार्थ्यांनी एचआयव्ही, एड्स व युवक, मातेकडून बालकांना होणारे एचआयव्ही संक्रमण निर्मूलन जनजागृतीपर पथनाट्य सादर केले.

Thane Edition
Aug 13, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

**(H)**

**TRI-COLOR RALLY HELD AT DNYANSADHANA COLLEGE FOR AZADI KA AMRIT MAHOTSAV**

At Satish Pradhan Dnyansadhana College, a Tri-Color Rally was organized as part of the Azadi Ka Amrit Mahotsav campaign. The event saw 150 NSS and NCC students participate, carrying the national flag and chanting patriotic slogans. The rally moved from the college to the Mental Hospital and back, featuring a Guard of Honor, a parade march, and performances of national songs. Principal Dr. Ganesh Bhagure highlighted the significance of Independence Day, and students who were selected for the Agniveer scheme were honored by Respected Shri. Satish Pradhan.


## ज्ञानसाधना महाविद्यालयात तिरंगा रॅली

ठाणे, ता. २२ (बातमीदार) : आझादी का अमृतमहोत्सव या अभियानांतर्गत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यायालयातील एन.एस.एस व एन.सी.सी च्या १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. हातात तिरंगा व 'भारतमाता की जय', 'वंदे मातरम'च्या घोषणा देत हर घर तिरंगा रॅली काढली. ज्ञानसाधना महाविद्यालयात ते मेंटल हॉस्पिटल व तिथून पुन्हा ज्ञानसाधना महाविद्यालयापर्यंत रॅली काढली होती.

या कार्यक्रमात राष्ट्रगीत, झेंडा गीत, महाराष्ट्र गीत गाऊन राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या कॅडेटसने गार्ड ऑफ ऑनर व परेड मार्च करुन राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. याप्रसंगी प्राचार्य डॉ.गणेश भगूरे यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व विशद करणारा संदेश दिला. यावेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या किरण शिंदे, दिपीकेश भुवड, धीरज पाडले या कॅडेट्सची अग्निवीर योजनेअंतर्गत सैन्यदलात निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष सतीश प्रधान यांनी सत्कार केला.

**(I)**

**GURUVARAYA S.V. KULKARNI HONORARY LECTURE SERIES | FIRST SESSION | DECEMBER 16, 2022 | MR. RAVI JADHAV**




**Link: https://www.youtube.com/watch?v=FLNJ8WlFjd4**

**(J)**

**GURUVARYA S.V. KULKARNI HONORARY LECTURE SERIES | SECOND SESSION | DECEMBER 17, 2022 | PROF. NAMDEVRAO JADHAV**







**Link: https://www.youtube.com/watch?v=DlLSltpC6Lo**

**(K)**

**YOGA DAY CELEBRATION AT**

**SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE, THANE**

Satish Pradhan Dnyanasadhana College in Thane celebrated Yoga Day with great enthusiasm, organized by the NCC unit, the National Service Scheme (NSS), and the Sports Department. The event highlighted the importance of yoga in daily life, with 138 students, staff, and faculty participating in various yoga activities.

ठाणेवैभव

## ज्ञानसाधना महाविद्यालयात योग दिन उत्साहात



**ठाणे:** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे येथे एन.सी सी. युनिटची मुले आणि मुली, नागरी संरक्षण दल, राष्ट्रीय सेवा योजना विभाग (कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालय)तसेच क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ' जागतिक योग दिनानिमित्त' जनजागृती रॅली आणि विविध योगअभ्यास सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण लांगी विद्यार्थ्यांना आपल्या दैनंदिन जीवनात, आयुष्यात योगाचे किती महत्व आहे ते पटवून दिले. तर प्रा.सुरेश हलबांडगे योग अभ्यासक म्हणून लाभले. त्यांनी व्याख्यान आणि प्रात्यक्षिकाद्वारे योगाचे महत्व सांगून विविध आसनांचे प्रात्यक्षिक करून घेतले. 'योग म्हणजे जीवनसंजीवनी' हे तत्त्व त्यांच्या विवेचनाचे सार होते. या कार्यक्रमात जोशी बेडेकर महाविद्यालय आणि आर. एफ. नाईक हायस्कुल, कोपरखैरणे, नवी मुंबई या महाविद्यालयातील गर्ल्स कॅडेट्स आणि एन. सी.सी अधिकारी कॅप्टन. माधवी जोशी, प्रा.पूजा आवारे आणि प्रा.वैशाली भंडारी सहभागी झाले होते. या कार्यक्रमात 138 एन.सी. सी. कॅडेट्स व इतर विद्यार्थी, 31 शिक्षक आणि 4 शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी होते.

सदर कार्यक्रमास एन. सी. सी. गर्ल्स प्रमुख लेफ्टनंट डॉ.राधिका मुखर्जी, एन.सी. सी. बॉईज प्रमुख लेफ्टनंट प्रा. दिलीप वसावे, नागरी संरक्षण दल प्रमुख प्रा. हरेश्वर भोये, राष्ट्रीय सेवा योजना वरिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा.बाबासाहेब कांबळे व राष्ट्रीय सेवा योजना कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख प्रा. शंकर झंजे आणि क्रीडा विभाग प्रमुख प्रा.अरुणा केंद्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

MAI Edition
20220627 Page No. 2
http://epalogo.com/

# ACADEMIC YEAR 2023-2024

**(A)**

**SAHIL SELECTED FOR STATE-LEVEL REPUBLIC DAY PARADE**

Thane: Sahil Hussein Ladaf, a second-year commerce student at Satish Pradhan Dnyanasadhana College in Thane, has been selected for the state-level Republic Day parade. Sahil achieved this success through hard work and strong determination. The University of Mumbai's National Service Scheme (NSS) department selected him as a volunteer for the state-level Republic Day parade to be held on January 26. Under the guidance of the college's NSS program officers, Dr. Babasaheb Kamble, Dr. Manoj Wagh, and Prof. Farhat Khan, Sahil has reached this milestone. The college's principal, Dr. Ganesh Bhagure, and the institution's secretary, Kamlesh Pradhan, have extended their best wishes to him.



ठाणेवैभव

**राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलनासाठी साहिलची निवड**

**ठाणे:** ठाणे सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील वाणिज्य शाखेत पदवीच्या दुसऱ्या वर्षाला शिकत असलेल्या साहिल हुसेन लदाफ याची राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनी परेड संचालनासाठी निवड झाली.

कठोर परिश्रम आणि प्रखर इच्छाशक्तीच्या जोरावर साहिल हुसेन लदाफ याला हे यश मिळाले. मुंबई विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 26 जानेवारी रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय प्रजासत्ताकदिन

➤पान ६ वर

WAI Edition
20240125 Page No. 5
http://erelego.com/

ठाणेवैभव

**राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलनासाठी साहिलची निवड**

\संचालन शिबिर 2024 साठी मुंबई विद्यापीठातर्फे परेड संचलनात स्वयंसेवक म्हणून निवड झाली.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.बाबासाहेब कांबळे, डॉ.मनोज वाघ, प्रा.फरहत खान यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ.गणेश भगुरे आणि संस्थेचे सचिव कमलेश प्रधान यांनी त्याला शुभेच्छा दिल्या.

**(B)**

**STUDENTS GAIN INSIGHT INTO TRAFFIC RULES AND ROAD SAFETY**

**TRAFFIC SAFETY AWARENESS LECTURE HELD AT SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE IN COLLABORATION WITH THANE CITY POLICE**

Police Inspector Ravindra Wani emphasized the importance of adhering to traffic rules to prevent accidents and ease traffic congestion. The Satish Pradhan Dnyanasadhana College, in collaboration with the Thane City Police Commissionerate, held a public awareness lecture on traffic rules and road safety to mark Police Establishment Day. During the event, Prof. Rajendra Vekhande welcomed the attendees with a bouquet. Wani used a PowerPoint presentation to explain traffic rules and signs and facilitated a Q&A session with the 65 students present. The attendees included members from the National Service Scheme, National Students' Union, and Civil Defense Corps.



लोकमत

# विद्यार्थ्यांनी घेतले वाहतूक नियमांचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : वाहतुकीच्या नियमांचे पालन करून गाडी चालवल्यास अपघात वा वाहतूककोंडी होणार नाही. अपघात रोखण्यासाठी पोलिसांनाही मदत होईल, असा सल्ला पोलिस निरीक्षक रवींद्र वाणी यांनी दिला.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे व पोलिस आयुक्तालय, ठाणे शहर (वागळे वाहतूक उपविभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने पोलिस स्थापना दिवसाचे औचित्य साधून 'वाहतुकीचे नियम व रस्ता सुरक्षा' या विषयांवर जनजागृतीपर व्याख्यान झाले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. राजेंद्र वेखंडे यांच्या हस्ते त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले होते.

## ६५ विद्यार्थी उपस्थित

वाणी यांनी वाहतुकीचे नियम व चिन्हांबद्दल विद्यार्थ्यांना पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून मौलिक मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांबरोबर प्रश्नोत्तर पद्धतीने चर्चा केली. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, नागरी संरक्षण दलाचे ६५ विद्यार्थी उपस्थित होते.

Hello Thane
Page No. 4 Jan 08, 2024
Powered by: erelego.com

**(C)**

The article in the image reports on a significant achievement at Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane. Sahil Ladaf, a second-year commerce student from the college, has been selected for the prestigious role of leading the parade during the State-level Republic Day celebrations in Maharashtra. This selection was made by the University of Mumbai and the National Service Scheme (NSS) Department for the Republic Day Camp 2024 in Mumbai.

Sahil's leadership and service as a parade commander were recognized, and he will represent the university and the NSS at the event. He received guidance and support from college officials, including Dr. Babasaheb Kamble, Dr. Manoj Wadh, and Prof. Farhat Khan. This accomplishment is a testament to Sahil's dedication and the college's commitment to fostering leadership and civic engagement among its students.



लोकमत

# संचलनासाठी ज्ञानसाधनाच्या साहिलची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील वाणिज्य शाखेत पदवीच्या दुसऱ्या वर्षाला शिकत असलेल्या साहिल लदाफ याची राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनी परेड संचलनासाठी निवड झाली आहे.

मुंबई विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे २६ जानेवारी रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिर २०२४ साठी मुंबई विद्यापीठातर्फे परेड संचलनात स्वयंसेवक म्हणून निवड झाली. त्याला कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब कांबळे, डॉ. मनोज वाघ, प्रा. फरहत खान यांचे मार्गदर्शन लाभले.

Hello Thane
Page No. 6 Jan 25, 2024
Powered by: erelego.com

**(D)**

**DNYANSADHANA COLLEGE ORGANIZES BLOOD DONATION DRIVE, COLLECTS 72 UNITS**

Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane marked its 43rd anniversary by organizing a blood donation drive at Thane Railway Station, in collaboration with NSS, NCC, and the Citizens Defence Corps. The event, which collected 72 units of blood, saw active participation from college leaders, students, and district officials, who not only coordinated the drive but also donated blood themselves. Guided by program officers and supported by J.J. Mahanagar Blood Bank and the National Railway Labor Union, the initiative highlighted the college's commitment to public health and community service.

लोकमत

# 'ज्ञानसाधना' ने केले ७२ रक्तपिशव्यांचे संकलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** ठाणे सोसायटीच्या ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या ४३व्या वर्धापन दिनानिमित्त मंगळवारी ठाणे रेल्वे स्थानक येथे राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि नागरी संरक्षण दल यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर झाले. यातून ७२ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

वरिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सीमा केतकर, डॉ. मंजिरी गोंधळेकर, डॉ. अंजली देशपांडे आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सीताराम वाहुळे यांनी शिबिराला भेट देऊन रक्तदात्यांना प्रमाणपत्रे प्रदान केली. जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी स्वेच्छेने संपर्क साधून शिबिराला हजेरी लावत रक्तदान केले. कमांडो सुमित साळुंखे यांनी रक्तदान केले. प्रा. अतुल पाटील, प्रा. धनंजय ठाकूर यांना रक्तदान केल्याबद्दल जे. जे. महानगर रक्तपेढी यांच्यातर्फे महाविद्यालयाला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



## मोलाचा सहभाग

नियोजनात रा. से. योजना, राष्ट्रीय छात्र सेना, नागरी संरक्षण दलाच्या एकूण ४० विद्यार्थ्यांसह डॉ. सचिन पुराणिक, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब कांबळे, डॉ. सोनाली कोकणे, डॉ. मनोज वाघ, कनिष्ठ महाविद्यालयाचे रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. शंकर झंजे, प्रा. महेश कुलसंगे, नागरी संरक्षण दल प्रमुख प्रा. हरेश्वर भोये, राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख लेफ्टनंट दिलीप वसावे, प्रा. वंदना बेंके, प्रा. मोनाली दरणकर, जे. जे. महानगर रक्तपेढीचे प्रतिनिधी अजय भिसे यांनी मोलाची भूमिका निभावली. शिबिरासाठी लायन्स क्लब, जे. जे. महानगर रक्तपेढी, नॅशनल रेल्वे मजदूर युनियन यांची मदत लाभली.

Hello Thane
Page No. 4 Sep 01, 2023
Powered by: erelego.com

**(E)**

## SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE CELEBRATES DIWALI WITH ADIVASI COMMUNITY AT OHLA WADI

Satish Pradhan Dnyanasadhana College, Thane along with the National Service Scheme, celebrated Diwali at Ohla Wadi on November 8, 2023, by distributing special Diwali kits to 350 individuals and 55 families from the Adivasi community. The event took place near Kasara Railway Station and aimed to spread joy and festive cheer among underprivileged families. Faculty and staff actively participated in the initiative, making it a heartwarming and successful celebration.

### ठाणेवैभव



### ओहळाची वाडी येथे ज्ञानसाधना कॉलेजने साजरी केली दिवाळी

**ठाणे:** ज्ञानसाधना परिवार आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने 8 नोव्हेंबर,2023 रोजी दिवाळीच्या पूर्वसंध्येला दिपोत्सव मानवतेचा, आनंदमेळा दिपावलीचा' हा दिपावली विशेष उपक्रम राबविण्यात आला.

शहापूर तालुक्यातील, कसारा स्टेशनजवळील ओहळाचीवाडी या गावातील ग्रामस्थांना दिवाळी फराळ व पणत्या भेट देणे, तेथील शालेय विद्यार्थ्यांना शालेयपयोगी साहित्य व शाळेला घसरगुंडी व अभ्यासाशी निगडित खेळणी देणे असे या उपक्रमाचे स्वरुप होते. या उपक्रमास आवश्यक निधीसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी सढळ हस्ते मदत केली.

साधारणतः 350 लोकसंख्या आणि 55 कुटुंबे असलेले ओहळाचीवाडी हे आदिवासीबहुल गाव मुंबई-नाशिक महामार्गालगत वसलेले आहे. येथील प्राथमिक शाळेत एकूण 55 विद्यार्थी शिकत आहे. शेती करणे हा येथील मुख्य व्यवसाय आहे.

या उपक्रमामुळे राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेच्या 19 विद्यार्थ्यांना 'सामाजिक जाणिवेचा' एक नवा धडा शिकता आला.

उपक्रमास संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, खजिनदार सतीश शेठ, प्राचार्य डॉ.गणेश भगुरे, उपप्राचार्य प्रा.सीताराम वाहुळे, पर्यवेक्षक प्रा.राजेंद्र येखंडे, प्रशासकीय उपप्राचार्य प्रा.दिनेश जोशी यांच्या मार्गदर्शनपर आणि प्रेरणादायी शुभेच्छा लाभल्या. उपक्रमाच्या आयोजनात रा.से.यो कार्यक्रम अधिकारी डॉ.बाबासाहेब कांबळे (व.महाविद्यालय), प्रा.शंकर झांजे व प्रा.महेश कुलसंगे (क.महाविद्यालय) व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाची भूमिका निभावली. तर नियोजनात डॉ.सचिन पुराणिक, लेफ्टनंट दिलीप वसावे, प्रा.किसन धादवड, प्रा. दिपाली शितूत, प्रा.स्मिता परब, प्रा.कांतीलाल चव्हाण यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### आदिवासी पाड्यावर दिव्यांचा सण

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज आणि राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी दिवाळीच्या पूर्वसंध्येला शहापूर तालुक्यातील कसारा रेल्वे स्थानकाजवळ ओहळाची वाडी या आदिवासी पाड्यावर दीपोत्सव आणि आनंदमेळा साजरा करण्यात आला. यावेळी पाड्यावरील रहिवाशांना दिवाळी फराळ आणि पणत्या भेट देण्यात आल्या. तसेच तेथील शालेय विद्यार्थ्यांना शालेयपयोगी साहित्य, घसरगुंडी व अभ्यासाशी निगडित खेळणी देण्यात आली.

कॉलेजमधील प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी या उपक्रमासाठी लागणाऱ्या निधीसाठी सढळ हस्ते मदत केली. सुमारे ३५० लोकसंख्या आणि ५५ कुटुंबे असलेले ओहळाची वाडी हे आदिवासीबहुल गाव मुंबई- नाशिक महामार्गालगत आहे. येथील प्राथमिक शाळेत एकूण ५५ विद्यार्थी शिकत आहे. डॉ. सचिन पुराणिक, लेफ्टनंट दिलीप वसावे, प्रा. किसन धादवड, प्रा. दीपाली शितूत, प्रा. स्मिता परब, प्रा. कांतीलाल चव्हाण यांनी आनंदमेळ्याचे नियोजन केले.



ज्ञानसाधना, एनएसएसतर्फे उपक्रम

**(F)**

## ACTOR AADESH BANDEKAR HIGHLIGHTS MEMORIES OF BALASAHEB THACKERAY AT THANE IN THE EVENT OF SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE.

Renowned actor Aadesh Bandekar delivered the inaugural lecture of the "Guruvarya S. V. Kulkarni Gaurav Lecture Series" at Satish Pradhan Dnyanasadhana College in Thane. He shared personal anecdotes and highlighted the lasting influence of Balasaheb Thackeray's words. The event, part of the college's NSS initiatives, saw Bandekar honored with a statue of Swami Samarth, a shawl, and a coconut by key institution officials. Bandekar expressed his delight at participating in the event.

नवराष्ट्र

### ठाण्यातील विद्यालयात दिला आठवणींना उजाळा

# बाळासाहेबांचे शब्द विसरू शकणार नाही : बांदेकर

ठाणे, (वा.) सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या गुरुवर्य स. वि. कुलकर्णी गुरुवर्य स.वि कुलकर्णी गौरव व्याख्यानमालेचे पहिले पुष्प अभिनेते आदेश बांदेकर यांनी गुंफले. यावेळी आभिनेते आदेश बांदेकर यांनी आपल्या आयुष्यातील चढ उतार सांगत असताना हिंदुह्रदसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आठवणींना उजाळा दिला.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यलयाच्या राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांतर्गत गुरुवर्य स. वि. कुलकर्णी गौरव व्याख्यानमालेचे पहिले पुष्प सुप्रसिद्ध लोकप्रिय अभिनेते आदेश बांदेकर यांनी गुंफले. यावेळी



संस्थेचे अध्यक्ष सतीशचंद्र प्रधान, सहसचिव मानसी प्रधान, खजिनदार सतीश शेठ, आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांच्या हस्ते स्वामी समर्थांची मूर्ती,शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्यांनी आनंदी असल्याचे म्हटले आहे.

Thane Navi Mumbai Palghar Edition
22 December 2023 Page No. 3
epaper.navarashtra.com

सकाळ

# वडिलांनी दिलेल्या शिक्षेमुळेच घडलो

## आदेश बांदेकर यांचा विद्यार्थ्यांशी संवाद; ज्ञानसाधना महाविद्यालयात व्याख्यान

ठाणे, ता. २६ (बातमीदार) : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांतर्गत गुरुवर्य स. वि. कुलकर्णी गौरव व्याख्यानमालेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प सुप्रसिद्ध लोकप्रिय अभिनेते आदेश बांदेकर यांनी गुंफले. होम मिनिस्टर कार्यक्रमाद्वारे घराघरात पोहचलेले आदेश बांदेकर यांनी रसिक प्रेक्षकांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आदेश बांदेकर म्हणाले की, लहानपणापासून मिळेल ते काम आनंदाने करायचे आणि ते काम देव



ठाणे : ज्ञानसाधनामध्ये आदेश बांदेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

मानून करायचे. 'दहावीला ३७ टक्के गुण मिळाल्यावर आत्महत्येचा विचार मनात आला होता. त्यावेळी मला वडिलांनी टक्के विचारले नाही; मात्र शिक्षा म्हणून सोसायटीतील प्रत्येक घरात जाऊन पेढे द्यायला सांगितले अन् मिळालेले टक्के सांगायला सांगितले. टक्के सांगताना प्रचंड दुःख झाले होते. पण वडिलांनी त्यावेळी घराघरात पेढे वाटण्याची कळत नकळतपणे दिलेली शिक्षा ही माझ्या आयुष्याची खरी खुरी यशस्विता आहे, असे ते म्हणाले.

सुरुवातीला मिळेल ती छोटी कामे केली. महाराष्ट्राची लोकधारा हा कार्यक्रम तसेच पुरुषोत्तम बेर्डे यांच्या टुरटुर, मुंबई - मुंबई या नाटकांमधून अभिनय केला. नाटक, कला, क्रिडा, विविध मालिका ते राजकारण आणि राजकारणातून साधलेले समाजकारण या विषयी त्यांनी भाष्य केले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सतीशचंद्र प्रधान, सहसचिव मानसी प्रधान, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भागुरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य सिताराम वाहुळे, आदी उपस्थित होते.

Mumbai, Thane-Today
27/12/2023 Page No. 3

ठाणेवैभव

# कठीण परिस्थितीत सकारात्मक वागणूक उज्ज्वल भविष्य घडवते

**ठाणे:** 'कठीण परिस्थितीत केलेली सकारात्मक वागणूक उज्ज्वल भविष्य घडवते, याची अनुभूती मला मिळाली. मिळेल ते काम देव मानून केले, त्यामुळे यश पाहता आले, असे सांगून आदेश बांदेकर यांनी विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत निराश होऊ नका, असा सल्ला दिला.

बुधवार 20 डिसेंबर 2023 रोजी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांतर्गत दरवर्षीप्रमाणे यंदाही गुरुवर्य स. वि. कुलकर्णी गौरव व्याख्यानमालेचे आयोजन महाविद्यालयाच्या प्रांगणात संध्याकाळी करण्यात आले होते.

या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प सुप्रसिद्ध लोकप्रिय अभिनेते आदेश बांदेकर यांनी गुंफले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सतीशचंद्र प्रधान, सहसचिव मानसी प्रधान, खजिनदार सतीश शेठ, आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांच्या हस्ते स्वामी समर्थांची मूर्ती, शाल आणि श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. आपल्या कर्तृत्वाने यशोशिखरावर पोहोचलेल्या प्रतिभावंत व्यक्तिमत्त्वाचा प्रेरणादायी जीवनप्रवास प्रेक्षकांना ज्यांच्यामुळे ऐकायला मिळाला त्या मुलाखतकार सुप्रसिध्द कवयित्री डॉ.प्रज्ञा पवार आणि निवेदिका वृंदा दाभोलकर यांचेही यावेळी भेट वस्तू देऊन स्वागत केले.

होम मिनिस्टरद्वारे घराघरात पोहचलेले वहिनींचे लाडके भावोजी आदेश बांदेकर यांनी ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या प्रांगणात रसिक

## आदेश बांदेकर यांनी गुंफले व्याख्यानमालेचे पहिले पुष्प



प्रेक्षकांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. स्वतःच्या जीवन प्रवासाबद्दल आदेश बांदेकर म्हणाले की,'लहान पणापासून मिळेल ते काम, जमेल ते काम आनंदाने करायचे आणि ते काम देव मानून करायचं' पुढे ते म्हणाले, 'दहावीला 37 टक्के गुण मिळाल्यावर आत्महत्येचा विचार मनात आला होता, पण घाबरत-घाबरत घरी आलो. पास झालो म्हणून वडीलही खुश झाले होते. पण किती टक्के मिळाले हे मात्र त्यांना माहित नव्हते. आनंदाच्या भरात त्यांनी पेढे आणले. ते पेढे सोसायटीतील प्रत्येक घरात जाऊन द्यायला सांगितले. त्यावेळी मिळालेले टक्के सांगायला सांगितले. टक्के सांगताना प्रचंड दुःख होत होते. वडिलांनी त्यावेळी घराघरात पेढे वाटण्याची कळत नकळतपणे दिलेली शिक्षा ही माझ्या आयुष्याची खरी खुरी यशस्विता आहे" असे ते म्हणाले.

महाविद्यालयीन युवावर्गाला संबोधित करताना ते म्हणाले, "कठीण परिस्थितीत केलेली सकारात्मक वागणूक उज्ज्वल भविष्य घडवते, याची अनुभूती मला मिळाली" सुरुवातीला मिळेल ती छोटी कामे करतानाच महाराष्ट्राची लोकधारा हा कार्यक्रम तसेच पुरुषोत्तम बेर्डे यांच्या टुरटुर, मुंबई-मुंबई या नाटकांमधून अभिनय केला. नाटक, कला, क्रिडा, विविध मालिका ते राजकारण आणि राजकारणातून साधलेले समाजकारण, यांवर ते बोलले.


यशोशिखरावर असणाऱ्या बांदेकरांची नाळ आजही त्यांच्या जुन्या परिसराशी जोडलेली आहे, हे सांगताना ते म्हणाले "माझे बालपण अलिबागेत गेले, नंतर अभ्युदयनगर येथे मी वाढलो, त्यामुळे आजही मी लालबागच्या राजाच्या मिरवणुकीत न चुकता सहभागी होतो".

'होम मिनिस्टर बद्दल बोलताना ते म्हणाले, "सुरुवातीला केवळ 13 भागांसाठी प्रसारित केला जाणारा ह्या कार्यक्रमाने आज यशस्वीपणे 20 वर्षे पूर्ण केली, आणि जगातील हा एकमेव कार्यक्रम आहे की रोज ज्याचे नवनवीन भाग प्रसारित होतात. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मला असंख्य माउलींना भेटता आले, त्या सर्वांच्या शुभेच्छा व आशीर्वाद कायम माझ्यासोबत आहेत. सांगलीतील 99 वर्षांच्या नालिनीताई जोशी यांची त्यांनी आवर्जून भेट घेतली, त्यांच्या शंभरीच्या कार्यक्रमातही त्यांनी भेट दिली, हा सर्व प्रसंग ध्वनीचीत्रफितीच्या साहाय्याने प्रेक्षकांना दाखविण्यात आला.

बाळासाहेबांनी भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधत मला मातोश्रीवर बोलाविले होते, आणि भगव्याचे वेड सुरवातीपासूनच असल्याने मी माझे आदर्श बाळासाहेबांना भेटून शिवसेनेत प्रवेश केला. "राजकारणात अपयश आले तरीही, आमच्या ह्दयात तुम्हाला कायमचे स्थान आहे", हे बाळासाहेबांचे शब्द मी कधीही विसरु शकणार नाही, असे म्हणून त्यांनी दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांबद्दलच्या भावनांना वाट मोकळी करुन दिली.

सिदधिविनायक मंदिर न्यासचे अध्यक्ष असताना तेथील सर्वच कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करुन, त्यांना नियमित वेतनश्रेणी मिळवून देण्यात मी शासनाकडे पाठपुरावा केला, आणि त्यात यश मिळाल्याचा आनंद मला आजही खूप मोलाचा वाटतो, असे ते म्हणाले.

MAI Edition
20231222 Page No. 4
http://erelego.com/




**Link:** https://www.youtube.com/watch?v=YBYxVgkSwSc

**(G)**

## TRI-COLOR RALLY AND FLAG HOISTING AT SATISH PRADHAN DNYANSADHANA COLLEGE FOR AZADI KA AMRIT MAHOTSAV

As part of the Azadi Ka Amrit Mahotsav campaign, Satish Pradhan Dnyansadhana College in Thane organized a "Har Ghar Tiranga" rally involving 150 NSS and NCC students. The rally, which included patriotic chants and a route from the college to the Thane Regional Mental Hospital and back, was flagged off by Principal Dr. Ganesh Bhagure and other officials. The event featured a flag hoisting ceremony led by Satishchandra Pradhan and a Guard of Honor by cadets, who were also honored for their selection into the Agniveer scheme.

लोकमत

# ज्ञानसाधना महाविद्यालयात ‘आझादी का अमृत महोत्सव’

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : केंद्र शासन पुरस्कृत आझादी का अमृत महोत्सवांतर्गत ‘हर घर तिरंगा’ मोहीम राबविण्यात आली. यानिमित्त ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाने सोमवारी सकाळी ‘हर घर तिरंगा’ फेरीचे आयोजन केले होते. यामध्ये कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील एनएसएस व एनसीसीच्या १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. हातामध्ये तिरंगा व ‘भारतमाता की जय’, ‘वंदे मातरम्’च्या घोषणा देत ‘हर घर तिरंगा’ फेरी महाविद्यालय ते ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालय व तेथून पुन्हा महाविद्यालयापर्यंत काढण्यात आली.


यावेळी प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, उपप्राचार्या डॉ. मृणाल बकाणे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. राजेंद्र वेखंडे यांनी तिरंगा ध्वज उंचावून फेरीला प्रस्थानासाठी परवानगी दिली. मंगळवारी सकाळी ८:१५ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात संस्थाध्यक्ष सतीशचंद्र प्रधान यांनी ध्वजारोहण केले. यावेळी संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, विश्वस्त श्रीकांत देवळे, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, उपप्राचार्या डॉ. सीमा केतकर, डॉ. मृणाल बकाने, डॉ. मंजिरी गोंधळेकर, डॉ. भूषण लांगी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य सीताराम वाहुळे, पर्यवेक्षक राजेंद्र वेखंडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात राष्ट्रगीत, झेंडागीत, महाराष्ट्र गीत गाऊन राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या कॅडेट्सनी गार्ड ऑफ ऑनर व परेड मार्च पास्ट (संचलन) करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी प्राचार्य डॉ. भगुरे यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्व विषद करणारा संदेश दिला. ध्वजारोहणासाठी उपस्थित सर्वांनाच स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रीय छात्र सेनेचे किरण संपत शिंदे, दीपिकेश भुवड, धीरज पाडले यांची अग्निवीर योजनेंतर्गत भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल कॅडेट्स व त्यांच्या पालकांचा संस्थाध्यक्ष सतीश प्रधान यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

Hello Thane
Page No. 2 Aug 18, 2023
Powered by: erelego.com

**(H)**

**GURUVARYA S.V. KULKARNI HONORARY LECTURE SERIES | SECOND SESSION | MR. MAHESH MHATRE | DECEMBER 21, 2023**




**Link: https://www.youtube.com/watch?v=ikHXIJWqbeI**

**(I)**

**INSPIRING TALK BY SQUADRON LEADER MANALI BIJUR AT SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE, THANE**

Squadron Leader Manali Bijur captivated students at Dnyanasadhana College, Thane, with her motivational speech on her journey in the Indian Air Force, emphasizing dedication, preparation, and perseverance as keys to success.



ठाणेवैभव

स्क्वाड्रन लीडर मनाली बिजुर यांच्या आकाश गाथेने विद्यार्थी मंत्रमुग्ध



ठाणे परिसर

स्क्वॉड्रन लीडर मनाली यांच्याशी संवाद

कॉलेज वृत्त

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

नाजुका धारे हिला 'शिवछत्रपती पुरस्कार'